# सहस्त्रार, प्रकाशाचा लोक

ईशा सरदेसाई यांच्याद्वारे लिखित

बाबा मुक्तानंद यांच्या महासमाधी सोहळ्याच्या सन्मानार्थ

**सिद्धयोग महोत्सव सत्संग**

शनिवार, ३१ ऑक्टोबर, २०२०

असे वाटते की, मनुष्य म्हणून आपले अधिकांश कार्य हे आहे, की आपल्या जीवनाला व आपल्या जगाला अर्थ प्रदान करणे आणि असे करून या विशाल, सुंदर, गुंतागुंतीच्या जगतात, ज्याचा आपण एक भाग आहोत, काही प्रमाणात सुरक्षिततेचा भाव प्राप्त करणे. आपण जेव्हा लहान मूल असतो, तेव्हा आपण आपल्या आजूबाजूच्या परिसराला पाहून विस्मित होतो, असे विचारतो की, *ते* काय आहे, आपण कोण आहोत, तिथल्या त्या वस्तूचा आपल्याशी काय संबंध आहे. ही जिज्ञासा, म्हणजेच या जगताचा अर्थ जाणून-समजून घेण्याची, आणि त्यामध्ये आपले स्थान काय आहे, हे जाणण्याची-समजून घेण्याची तीव्र उत्कंठा ही आपले वय वाढले तरी लुप्त होत नाही. आपण केवळ कल्पना व आपल्यावर लागलेली लेबले यांचा संचय करत जातो, रितीरिवाज आणि परंपरा, काय चांगले आणि मूल्यवान आहे याविषयीच्या धारणा आणि मते गोळा करत जातो, आणि हे सर्व विभिन्न मात्रेत, जाणण्याच्या-समजून घेण्याच्या आपल्या तीव्र उत्कंठेचे समाधान करतात.

तरीदेखील आपल्या या जगताविषयी कोणत्याही प्रकारचे अनुमान लावता येऊ शकत नाही. गोष्टी कशा असायला हव्यात, काय बरोबर आहे आणि काय चूक आहे, आपण आणि इतरांनी कशा प्रकारे वागायला पाहिजे, याविषयी आपले *व्यक्तिगत* विचार आहेत. परंतु, बरेचदा, आपण आपल्या आजूबाजूला जे पाहतो, ते आपल्या मानदंडांनुसार नसते. आपण भरपूर प्रयत्न करतो की, आपण असे जीवन घडवावे, जे सुव्यवस्थित असावे, ज्याला उद्देश असावा; पण भरपूर प्रयत्न करूनही आपण अशा परिस्थितींमध्ये असतो की, ज्या तर्क किंवा समज यांच्याहून विपरीत असतात.

अशा परिस्थितींमध्ये आपण काय करायला हवे?

सिद्धयोग मार्गाचे विद्यार्थी असल्याच्या नात्याने आपण हे जाणतो की, ही आपल्या कर्तव्यकर्मांचा त्याग करण्याविषयीची गोष्ट नाही आणि याचा अर्थ असाही नव्हे, की सर्वकाही सोडून निघून जावे. याउलट, याचा अर्थ हे समजून घेणे आहे की, या प्रकट जगतात *आणखीही काहीतरी आहे.* बळाची आणि शक्तीची भांडारे आपल्यासाठी उपलब्ध आहेत ज्यांच्यात कधीही घट होऊ शकत नाही, अर्थ व उद्देश यांनी परिपूर्ण असे स्रोत आपल्यासाठी उपलब्ध आहेत जे त्या परिस्थितींवर अवलंबून नाहीत ज्यांच्यावर आपले नियंत्रण सीमित आहे. आपल्या अंतरी पूर्णच्या पूर्ण लोकलोकांतरे आहेत ज्यांचा शोध अजूनही घेतला गेलेला नाही, प्रकाशाचा असा लोक आहे, जो इतका डोळे दिपवून टाकणारा आहे की, बहिर्मुखी डोळे त्याला पाहूच शकत नाहीत. आपण श्रीगुरूंपाशी येतो, आपण साधना करतो जेणेकरून आपण या *आंतरिक* जगताचा अनुभव घ्यावा—आणि याच्या फलस्वरूप एका विस्तृत व ज्ञानयुक्त बोधासह या पृथ्वीवर आपले जीवन जगावे.

बाबा मुक्तानंदांनी सहस्राराविषयी अतिशय उत्साहाने शिकवले, त्या सहस्रदल कमलाविषयी, जे सूक्ष्म शरीरात मस्तकाच्या वरच्या भागात स्थित आहे. एक साधक म्हणून तेच आपल्या यात्रेचे गंतव्यस्थान आहे; सिद्धयोग मार्गावर तेच आपल्या साधनेचे लक्ष्य आहे.

प्रश्नोपनिषदामध्ये सांगितले आहे की, सूक्ष्म शरीरात ७२० दशलक्ष नाड्यांचा समुदाय निहित आहे, या नाड्या आपल्या संपूर्ण अस्तित्वात प्राण प्रवाहित करतात. श्रीगुरूंच्या कृपेने आपल्या अंतरी कुंडलिनी शक्ती जेव्हा जागृत होते, तेव्हा ही चेतन व दिव्य शक्ती मध्य नाडी म्हणजेच सुषुम्ना नाडीमधून तिचे ऊर्ध्वगमन आरंभ करते. सुषुम्ना नाडीचा विस्तार स्थूल शरीरामध्ये पाठीच्या कण्याच्या समानांतर आहे.

कुंडलिनी शक्ती जसजशी ऊर्ध्वगमन करू लागते, तसतसे तिने आरंभिलेल्या रूपांतरण-प्रक्रियेला पोषित करण्यासाठी आपण आध्यात्मिक साधना करतो. आपण नामसंकीर्तन करतो, ध्यान करतो, दक्षिणा अर्पण करतो आणि आपण श्रीगुरुगीतेचे पठण करतो. जसजसे आपण सिद्धयोगाचे अभ्यास करत जातो, तसतशी शक्ती क्रमशः सहा चक्रांपैकी प्रत्येक चक्राचे शुद्धिकरण करत जाते; चक्र म्हणजे सुषुम्ना नाडीवर स्थित असलेले कमळाच्या आकाराचे ते केंद्रबिंदू आहेत जिथे सर्व नाड्या एकत्र येतात. परिणामी, प्राण सुषुम्ना नाडीमधून निघणाऱ्या लाखो नाडी समुदायांमधून गतिमान होतो आणि त्यांमध्ये संचित असलेल्या पूर्व संस्कारांना व कर्मांना नष्ट करत जातो. कुंडलिनी शक्तीची यात्रा वर, वर, वरच्या दिशेला पुढे जात राहते—ही शक्ती आपल्याला निर्मळ, शुद्ध करत जाते, आपल्याला दुःखकष्ट व कठोरपणा यांच्यापासून मुक्त करत जाते ज्यांना आपण आपल्या अंतरी दीर्घकाळापासून संचित करून

ठेवले आहे. ती आपल्याला साहाय्य करते, जेणेकरून आपण आपल्या अंतरी अधिकाधिक सामंजस्य आणू शकावे; असे ती तोपर्यंत करते, जोपर्यंत अखेरीस ती मस्तकाच्या वरच्या भागात स्थित असलेल्या सहस्रारापर्यंत पोहोचत नाही.

संस्कृत भाषेत 'सहस्रार' या शब्दाचा अर्थ आहे, 'एक हजार आरे.' या अर्थानुसार, या कमळाची किंवा चक्राची सहस्रदले मध्यबिंदूपासून निघून बाहेरच्या दिशेला, कुंडलाकारात पसरतात आणि अनंततेमध्ये व्याप्त होतात. ही दले विशुद्ध श्वेतवर्णी आहेत, यांचा आकार मनोहर आहे आणि यांमधून प्रसारित होणारा प्रकाश इतका तेजोमय असतो की, असे म्हटले गेले आहे, की यांची दीप्ति हजारो सूर्यांसमान आहे.

सहस्राराच्या मध्यभागी विद्यमान आहे, झगमगता ज्योतिर्मय नीलबिंदू, ज्याच्याविषयी बाबा सदैव शिकवत असत. नीलबिंदू तिळाच्या आकाराचा असतो, हा परम आत्म्याचे प्रतीक आहे आणि या संपूर्ण ब्रह्मांडाचे उगमस्थान आहे.

सहस्राराचे व नीलबिंदूचे दर्शन घेणे म्हणजे जीवात्मा व परमात्मा यांच्या एकाकार होण्याची अनुभूती करणे होय. याच कारणास्तव, असे म्हटले जाते की, सहस्राराच्या लोकात शब्द उरतच नाहीत. विचार तिथे पोहोचू शकत नाहीत. सहस्रार मनाच्या व इंद्रियांच्या शक्तींच्या पलीकडे आहे; ते त्या सर्वांच्या पलीकडे आहे ज्याच्याद्वारे आपल्या अस्तित्वाची व्याख्या करता येते. त्याऐवजी, इथे उदित होतो, पूर्णोऽहम्‌चा म्हणजे शुद्ध "मी आहे"चा बोध. आणि एका जन्मापर्यंत या "मी आहे"मध्ये आणखी काही उपाधी जोडल्यानंतर, आपले पुनर्मिलन होते, त्या प्रकाशाशी जो आपण तेव्हा होतो, जेव्हा तो प्रकाश आपल्या समस्त धारणांनी, कल्पनांनी, आपल्यावर लागलेल्या लेबलांनी व सिद्धान्तांनी संकुचित झाला नव्हता. बाह्य गोष्टींच्या आधारे जेव्हा आपण स्वतःची ओळख बनवतो, तेव्हा सुख-दुःख, प्रसन्नता-खिन्नता रूपी ज्या द्वंद्वांचा आपल्या अंतरी उदय व अस्त होत राहतो, इथे आपल्यावर त्यांची सत्ता राहत नाही.

सहस्राराच्या निवासस्थानात आपले अस्तित्व फक्त. . . असते. *मी आहे.* किंवा, जसे बाबा लोकांना असे म्हणायला शिकवत असत : *मी प्रकाश आहे.*

या सत्संगाचे शीर्षक आहे, 'दिव्य विश्रान्ति के लोक में वास करो' [दिव्य विश्रांतीच्या लोकात वास करा].

सिद्धयोग मार्ग अतुलनीय आहे, विशेषतः यामुळे की, या मार्गाचे अनुसरण आपल्याला इथे, या लोकात घेऊन येते. म्हणूनच बाबांनी जे केले, ते अत्यंत क्रांतिकारी होते—त्यांनी विश्वासाठी शक्तिपात सुलभ बनवला, त्यांनी लोकांना सहस्रार आणि नीलबिंदू यांविषयी शिकवणी प्रदान केल्या आणि त्यांचा प्रत्यक्ष अनुभव प्रदान केला. बाबा मुक्तानंद यांच्या कृपेने, भगवान नित्यानंद यांच्या कृपेने व गुरुमाई चिद्विलासानंद यांच्या कृपेने आपण वास्तवात दिव्य विश्रांतीच्या लोकामध्ये वास *करू शकतो.* सहस्रार म्हणजे एखादा विचार किंवा कल्पना नाही. ही एखादी गूढ संकल्पना नाही जिचा उपयोग केवळ शास्त्रीय उपदेशांपर्यंतच सीमित असेल. हा एक जिवंत अनुभव आहे, आध्यात्मिक मार्गावरील साधकांचा आणि हा तुमचा आहे जो तुम्हाला जाणायचा आहे, अनुभवायचा आहे.

© २०२३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.